(१)

# -कोजागिरी-

दरवर्षी हे पावसाळ्याचे चार महिने खूप गडबड असते. एकतर मधून मधून पाऊस धूम करत असतो सर्व सृष्टी पावसाने ओली चिंब झालेली असते. त्यातच सण वार आणि व्रत वैकल्यांची धामधूम होते. या चार महिन्यांना आपण चातुर्मास म्हणतो. चातुर्मास आषाढ शुध्द एकादशी ते कार्तिक शुध्द एकादशी असतो.

पावसाळा म्हणजे फुलांच्या बहराचा काळ. आषाढात पंढरीची वारी, यात्रा असते. श्रावणात तर जवळपास एक दिवसा आड कांहीतरी सण, व्रत, पूजा असे कार्यक्रम असतात तो पर्यंत भाद्रपद येतो. भाद्रपदात गणपतिची धामधूम पुढे आश्विनात देवीचे नवरात्र, दसरा आणि दसऱ्यानंतर येते ती कोजागिरी.

चार महिन्यातल्या पौर्णिमा महत्वाचीच असते आषाढात "व्यास (गुरु) पौर्णिमा, श्रावणात "राखी (नारळी) पौर्णिमा भाद्रपद पौर्णिमेला "भागवत" समाप्ति; आश्विन - कोजागिरी, पुढे मग त्रिपुरी वगैरे वर्षभर प्रत्येक पौर्णिमेचं वैशिष्ट्य आहे.

कोजागिरीला आश्विन पौर्णिमा, शरद पौर्णिमा, नवान्न पौर्णिमा लक्ष्मी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या खूप जवळ येतो आणि खूप तेजस्वी दिसतो. याच वेळी शेतात नवीन पीक येते. त्यालाच नवान्न म्हणतात त्या पिकाची शेतात पूजा करुन मग ते अन्न प्राशन करायचं. प्राचीन काळी यास "कौमुदी उत्सव" असेही म्हणत. या पौर्णिमेचा चंद्र मानवी मनाचा कारक असतो। त्याच्या किरणांमधे न्हाऊन निघाल्याने सगळीकडे सकारात्मक ऊर्जा असते.

या दिवशी लक्ष्मी, ऐरावत इंद्र यांची पूजा करुन खिरीचा नैवेद्य करतात. याच रात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून बाहेर पडून पृथ्वीवर येते आणि को जागर्ति असे विचारते. कोण जागं आहे? असं विचारुन जो जागर करतो त्यास धन, संपत्ति, सुख देते अशी आख्यायिका आहे.

(2)

Date: / /
Page No.:

तेव्हां सगळे लोक उत्तर रात्रीपर्यंत जागरण करतात. घराघरांत दूध आटवून त्यात केशर, वेलदोडा, सुकामेवा, साखर घालून तयार करतात. त्या दुधाचा चंद्राला नैवेद्य दाखवायचा आणि ते दूध पूर्ण चंद्रप्रकाशात कोमट झाल्यावर मग सगळ्यांना देतात. या रात्रीला चंद्र किरणांमध्ये वेगळीच ऊर्जा असते त्यामुळे सर्व पूर्ण चंद्र प्रकाशात बसतात. त्यावेळी गाण्याचे, भजनाचे, कीर्तन, प्रवचन असेही कार्यक्रम करतात. या चंद्रकिरणात बसल्याने त्वचेला फायदा होतो. तसेच कांही वेळ चंद्राकडे पाहाण्याने दृष्टी सुधारते.

शरद पौर्णिमा म्हणजे तो शरद ऋतूचू असतो. शरदात पित्तप्रकोप होतो म्हणून दूध घेणे चांगले असते. कोणाला आशिर्वाद देताना मोठी माणसं जीवेत् शरदः शतम् | असे म्हणतात असा हा शरद ऋतुत येणारा आपला कोजागिरीचा सण सर्वांचा आवडता.

आपल्याकडे या दिवशी ज्येष्ठ अपत्याची आश्विनी करण्याची पध्दत आहे. त्याला नवीन कपडे करायचे औक्षण करायचं. तोंड गोड करायचं. पण खरंच सांगते मला हे कधीच पटलं नाही. मुलं मोठी झाल्यावर त्यांना समजत पण लहान असताना धाकट्यांना वाटतंच आणि ते साहजिकच आहे. त्यांना नक्कीच वाटतं फक्त ताई(दादा) लाच का आम्हाला का नाही ओवाळायचं? सहज ओघानी आलं म्हणून हे लिहीलं. माझी मुलं लहान असताना मी मोठे धाकटे सगळ्यांना ओवाळायची हे ही सांगते. धाकट्यांनी हिरमुसली होऊन त्यात काय आनंद आहे. या मागे कांही सायंटिफीक कारण असेल असे मला वाटत नाही. माझ्या मतानी प्रत्येकजण पहिल्यांदाच आलेला असतो. माझ मत मी स्पष्टपणे मांडले त्याबद्दल राग नसावा. कोणाच्या भावना दुखवण्याचा हेतू नाही. तरी क्षमस्व.

(3)

केण्या कविने म्हटल्याप्रमाणे
दोन घडीच्या जीवनाला
देऊ दुधाची गोडी.

x





आशा पावगी.
"वृंदावन काम्प्लेक्स"
"आनंद वन" B-10
कोथरुड.
M-9689096951.

